**राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०१९-२०**
**राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३ विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली**

**क्रमांक:आशा-१/पो.भ.गट-१३/सन २०१९-२०/ /२०२२ गडचिरोली दिनांक /०५/२०२२**

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२ व त्यामध्ये शासनाने दिनांक १८.०१.२०१९ व दिनांक ०२.०८.२०१९ च्या आदेशान्वये सुधारित केलेल्या तरतुदीनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३ विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)संवर्गातील दिनांक ३१/१२/२०२० अखेर पर्यंत १०५ रिक्त पदाकरीता सशस्त्र पोलीस शिपाई भरती घेण्यात येणार आहे. दिनांक ३१/१२/२०२० अखेर पर्यंत रिक्त असलेल्या १०५ पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१) राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष):**

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | इडब्ल्यूएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | **०९** | **७५** | **०२** | **०१** | **०** | **०१** | **०२** | **०८** | **०७** | **००** | **१०५** |
| **कप्पीकृत आरक्षण ⬇** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०८ | ४४ | ०२ | ०१ | ० | ०१ | ०२ | ०७ | ०६ | ०० | ७१ |
| खेळाडू | ० | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०४ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०४ |
| भुकंपग्रस्त | ० | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| माजी सैनिक | ०१ | ११ | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ | ० | १४ |
| अंशकालीन पदवोधर | ० | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०४ |
| पोलीस पाल्य | ० | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| गृहरक्षक दल | ० | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०४ |
| **एकुण** | **०९** | **७५** | **०२** | **०१** | **०** | **०१** | **०२** | **०८** | **०७** | **००** | **१०५** |

**टिप :- महाराष्ट्र शासन, साप्रवि, शानिक्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२३/०८/२०२१ अन्वये वर दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांमधुन अनाथ उमेदवारांकरीता १% (१०५* १%=१.०५ म्हणजेच १ पद) उपलब्ध आहे. कागदपत्र तापासणी / निवड यादी तयार करतांना अनाथ उमेदवार ज्या प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गाच्या सर्वसाधारण समांतर आरक्षणामधुन कमी करण्यात येईल.**

**अ)** उपरोक्त पदे ही राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३ विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली कार्यालयातील दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत रिक्त असलेल्या पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत व बिंदूनामावलीनूसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

**ब)** अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३ विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली या घटकाच्या आस्थापनेवर प्रवर्गनिहाय रिक्त पदानुसार उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

**क)** पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधीन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकामध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**ड) (i) सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रीयेमध्ये उमेदवारांचे ई-मेल आयडीवर लेखी परिक्षेचे हॉल तिकीट उपलब्ध करुन देण्यात येईल.** उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. त्यासोबत अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परिक्षा द्यावी लागेल. प्रथम १०० गुणांची लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांबाबत ३३%) गुण मिळवून तसेच गोंडी व माडीया भाषेतील अतिरिक्त १०० गुणांची लेखी परिक्षेत किमान ३५%

गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. प्रथम लेखी परिक्षेमध्ये (गोंडी-माडीया चाचणी परिक्षा वगळून) प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत सामाजिक व समांतर आरक्षणात नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**(ii)** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली येथील सशस्त्र पोलीस शिपाई पदाकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांना भरतीमध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांचे महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्याचा **अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)** जोडणे आवश्यक राहील.

**(iii)** (अ)महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, दिनांक-०२/०८/२०१९ अन्वये "सशस्त्र पोलीस शिपाई पदावर निवड झालेले उमेदवार हे राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली मधुन १५ वर्षे आंतर गट बदलीपात्र असणार नाही."

(ब)महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्र क्रमांक : पीएमएन ०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दिनांक-१२/०५/२०२१ अन्वये राज्य राखीव पोलीस बलामधुन १२ वर्षे जिल्हा पोलीस दलात बदलीपात्र असणार नाही.

**(iv)** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या १२, दिनांक-१७/१२/२०२१ अन्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात जाहिराती प्रसिद्ध झाल्या नसल्याने काही उमेदवारांची दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक १७/१२/२०२१ पर्यंतच्या कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडली गेली असल्याने परिक्षेस बसण्याची संधी हुकली आहे, अशा उमेदवारांना **"एक वेळची विशेष बाब"** म्हणून आवेदन अर्ज सादर करण्याची संधी देण्यात येत आहे.

**२)** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली च्या आस्थापनेवरील जाहिरातीबाबत सविस्तर माहिती **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर Gr.१३ या Tab वर उमेदवारांकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच भरती प्रक्रियेत सहभागी होण्याकरीता लागणारा आवेदन अर्ज **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर Gr.१३ या Tab वर उपलब्ध करुन देण्यात आले असुन सदरचे आवेदन अर्जाची प्रिंट काढुन स्वहस्ताक्षरात परिपुर्ण भरुन संपूर्ण कागदपत्रांची साक्षांकित असलेली छायांकित प्रती व प्रवर्गानुसार (खुला- रुपये ४५०/-, मागास- रुपये ३५०/-) परिक्षा शुल्क चा डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीयकृत बँक) अथवा पोस्टल ऑर्डर **ADJUTANT SRPF GR.XIII** या नावाने काढून आवेदन अर्जासोबत खालील नमुद कोणत्याही एका कार्यालयात प्रत्यक्षात जमा करणे अनिवार्य राहिल. तसेच सदरचे आवेदन अर्ज पोस्टाद्वारे किंवा ईतर कोणत्याही मार्गाने स्विकारण्यात येणार नाहीत.

**३)** या गट आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रीयेमध्ये उमेदवारांकडुन ऑफलाईन पध्दतीने आवेदन अर्ज (१)समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली, (२)समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, उपमुख्यालय, कँम्प-नागपूर (रारापोबल गट क्र.४, हिंगणा रोड, नागपूर यांचे परिसरात) व (३)पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पोलीस मुख्यालय येथे प्रत्यक्षरित्या स्विकारण्यात येतील.

**४)** एका उमेदवाराने एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज सादर करु नयेत.

**<u>महत्वाची टिप :-</u>**

राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो, गडचिरोली यांना दूरध्वनी क्रमांक ०७१३२-२९५०२० वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३ विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष सशस्त्र पोलीस शिपाई भरती समिती २०१९-२० यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/ कार्यालयाचे नाव | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३ विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०७१३७- २९५०५३<br>मो.नं.९१३०१५८५८१ |

**(विवेक मासाळ)**
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१३, विसोरा
ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली.

दिनांक १८/०५/२०२२

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ मधील तरतुदी व त्यामध्ये शासनाने दिनांक १८.०१.२०१९ व दिनांक ०२.०८.२०१९ च्या आदेशान्वये सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार गृह विभागाच्या अधिपत्याखालील राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (गट-क) संवर्गातील रिक्त असलेली १०५ पदे भरण्यासाठी **ऑफलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहिरात व आवेदन अर्ज पोलीस विभागाच्या **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर Gr.१३ या Tab वर उपलब्ध आहे.

**-: आवेदन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक :-**

**जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणारे उमेदवार यांनी सशस्त्र पोलीस शिपाई पदाकरीता ऑफलाईन आवेदन अर्ज खालील नमुद विहित दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑफलाईन पद्धतीने सादर करावे.**

| | | |
|---|---|---|
| १ | **आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक** | दिनांक २१/०५/२०२२ वेळ १०.०० ते १८.०० पर्यंत **(कार्यालयीन वेळेत)** |
| २ | **आवेदन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** | दिनांक ०५/०६/२०२२ वेळ १०.०० ते १८.०० पर्यंत **(कार्यालयीन वेळेत)** |
| परीक्षेचा वेळापत्रकाचा तपशील **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. | | |

**१)** भरती प्रक्रिया संबंधीत सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**२)** पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पोलीस घटक प्रमुखांनी रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे घटक प्रमुखांनी दिलेल्या जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**३)** पोलीस भरती लेखी परीक्षा/मैदानी चाचणी परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधीत समादेशकांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. त्याचप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाकरिता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांचा शासन विहित नियमानुसार विचार केला जाईल. सदर पद भरती प्रक्रियेसंबंधात वाद, तक्रारी उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संबंधीत समादेशकांच्या कार्यालयाच्या भरती प्रक्रियेत नेमणूक करण्यात आलेल्या अपिलीय अधिकारी यांना राहील.

**४)** उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन (Offline) पध्दतीने स्विकारण्यात येणार असून अर्जासोबत शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे छायांकीत प्रत जोडणे अनिवार्य राहील. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता आवेदन अर्जात तपासूनच भरावी. उमेदवाराने त्यांच्या अर्जामध्ये पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. आवेदन अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी झाल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. आवेदन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही.

**५)** राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (गट-क) पदासाठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रथमत: **ऑफलाईन** लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांची आवेदन अर्जाची संख्या पाहून जिल्हयाचे ठिकाण व

परीक्षा केंद्र अंतिम करण्यात येईल व उमेदवारांना त्यांचे ई-मेल आयडीवर लेखी परिक्षेचे हॉल तिकीट उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) सदरहू भरती प्रक्रियेत कोणत्याही पदासाठी मुलाखत (मौखिक परीक्षा) घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत प्रथम घेण्यात येणाऱ्या ऑफलाईन लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार (गोंडी-माडीया चाचणी परिक्षा गुण वगळुन) प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात शारिरीक चाचणीसाठी उमेदवारांची निवड केली जाईल. अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरिता ज्या ज्या वेळी मागणी केली जाईल, त्या-त्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच, तात्पुरती निवडसूची तयार झाल्यावर कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविले जाईल. त्यावेळी शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरिता भरती समितीकडे उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**७) शारिरीक पात्रता:- राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई :**

| | |
|---|---|
| (i) उंची | १६८ सें.मी.पेक्षा कमी नसावी. |
| (ii) छाती | न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

**६.१ सूट :-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नलक्षविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

**उंची :** २.५ सें.मी.

**टीप:-** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ मधील नियम ३ चा उपनियम २ चा उपखंड (अ)(२) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमेदवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**६.२ खेळाडू उमेदवारासाठी:**

**(i) उंची :** २.५ सें.मी..

**६.३राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत:-** राज्य राखीव पोलीस बलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा एकाच पात्र नातेवाईकास पोलीस बलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

**(i) उंची :-** २.५ सें.मी.

**(ii) छाती:-** २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

**८) शैक्षणिक पात्रता:-** उमेदवारांनी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास धारण करणे आवश्यक आहे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | सशस्त्र पोलीस शिपाई | महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

**नक्षलग्रस्त भागासाठी शैक्षणिक अर्हतेत विशेष सूट:-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नलक्षविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील, मात्र असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाहीत.

**टीप:-** महाराष्ट्र राज्य राखीव बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ मधील नियम ३ चा उपखंड (ब) नुसार विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त उमदेवारांच्या बाबतीत शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**माजी सैनिक:** १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**८) वयोमर्यादा:-** वरील पदांसाठी **दिनांक ०५/०६/२०२२ रोजी** किमान व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील:

**राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र शिपाई पदासाठी वयोमर्यादा:**

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २५ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व., इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३० वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी सूट राहील. |
| ६. | अनाथ | १८ वर्षे | ३० वर्षे |
| ७. | अंशकालीन पदवीधर उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |

**इतर उमेदवार**

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २५+५ वर्षे | ३०+५ वर्षे. |
| २. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २५ वर्षे | ३० वर्षे |
| ३. | गृहरक्षक | १८ वर्षे | २५ वर्षे | ३० वर्षे |
| ४. | माजी स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १८ वर्षे | २५+३ वर्षे | ३०+३ वर्षे |

**महत्वाची सुचना :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या १२, दिनांक-१७/१२/२०२१ अन्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात जाहिराती प्रसिद्ध झाल्या नसल्याने काही उमेदवारांची दिनांक-०१/०३/२०२० ते दिनांक १७/१२/२०२१ पर्यंतच्या कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडली गेली असल्याने परिक्षेस बसण्याची संधी हुकली आहे, अशा उमेदवारांना "**एक वेळची विशेष बाब**" म्हणून आवेदन अर्ज सादर करण्याची संधी देण्यात येत आहे.

**९) ऑफलाईन परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम:-**

**१) १०० गुणाची लेखी चाचणी परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र. | पदाचे नांव | | विषय | | | | एकुण प्रश्न | परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंकगणित | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | बुध्दीमत्ता चाचणी | मराठी व्याकरण | | |
| १. | सशस्त्र पोलीस शिपाई | प्रश्न संख्या | २५ | २५ | २५ | २५ | १०० | ९० मिनिट |

**टिप :** प्रथम १०० गुणांची लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांबाबत ३३%) गुण मिळवून जे उमेदवार उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**२) अतिरीक्त १०० गुणाची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परिक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र | पदाचे नांव | | विषय | | | | एकूण प्रश्न | परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गोंडी भाषेच्या शब्दकोषाचे ज्ञान | वाक्यरचना / भाषांतर (मराठी ते गोंडी भाषा तसेच गोंडी ते मराठी भाषा) | माडीया भाषेच्या शब्दकोषाचे ज्ञान | वाक्यरचना / भाषांतर (मराठी ते माडीया भाषा तसेच माडीया ते मराठी भाषा) | | |
| १. | सशस्त्र पोलीस शिपाई | प्रश्न संख्या | २५ | २५ | २५ | २५ | १०० | ९० मिनिट |

**टिप :** गोंडी व माडीया भाषेतील अतिरिक्त १०० गुणांच्या लेखी परिक्षेत किमान ३५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. **परंतु गोंडी-माडीया भाषा चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण शारिरीक /मैदानी चाचणी निवड यादीकरीता व अंतिम निवड यादीकरीता ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

**१०) परीक्षा शुल्कः-** सदरचे शुल्क ना-परतावा आहे.

१. खुला वर्ग - रुपये ४५०/-
२. मागास वर्ग - रुपये ३५०/-
३. अनाथ - रुपये ३५०/-

**११) आवेदन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक :-**

सशस्त्र पोलीस शिपाई या पदाकरीता उमेदवार यांचेकरीता ऑफलाईन आवेदन अर्ज **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर गट १३ या Tab वर उपलब्ध राहतील. सदरचे आवेदन अर्ज संपुर्ण शैक्षणिक व ईतर महत्वाचे कागदपत्रांचे छायांकित प्रती व ०३ पासपोर्ट साईज फोटोसह दिनांक २१/०५/२०२२ ते ०५/०६/२०२२ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) सकाळी १०.०० ते १८.०० वाजता पर्यंत (१) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली, (२) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, उपमुख्यालय, कॅम्प-नागपूर (रारापोबल गट क्र.४, हिंगणा रोड, नागपूर यांचे परिसरात) व (३) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पोलीस मुख्यालय येथे प्रत्यक्षरित्या स्विकारण्यात येईल. तसेच सदरचे आवेदन अर्ज पोस्टाद्वारे किंवा ईतर मार्गाने स्विकारण्यात येणार नाही. वर नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क चा डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीयकृत बँकेचा असावा) अथवा पोस्टल ऑर्डर **ADJUTANT SRPF GR.XIII** या नावाने काढून आवेदन अर्जासोबत जमा करणे अनिवार्य राहिल. (मूळ कागदपत्रांची सूची मुद्दा क्रमांक १३ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे)

**१२)** एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील एकाच पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज सादर करु नये.

**१३) आवश्यक कागदपत्रे**

**१.**सशस्त्र पोलीस शिपाई पदाकरीता धारण करीत असलेले विहीत अर्हताची व त्यावरील शैक्षणीक गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला

**२.**जातीचे प्रमाणपत्र

**३.**महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र.

**४.**जात वैधता प्रमाणपत्र

५.अनु.जाती/अनु.जमाती/ईडब्लुएस व खुला या प्रवर्गातील उमेदवार वगळुन मार्च-२०२२ चे नॉन-क्रिमीलेअर (NCL) ग्राहय धरण्यात येईल.

६.आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र

७.शासकीय अथवा निमशासकीय किंवा अन्य प्रकारच्या सेवेत असलेल्या उमेदवारानी नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८.समांतर आरक्षणाबाबतचे (भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर, खेळाडु, माजी सैनिक, अनाथ, होमगार्ड व पोलीस पाल्य) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

९.वर नमुद सर्व आवश्यक कागदपत्रे दिनांक ०५/०६/२०२२ पर्यंत निर्गमीत केलेले असावेत व सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन आवेदन अर्जासोबत जोडण्यात यावे.

**१४) महत्वाच्या सूचना:-**

१.राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३ विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली येथील सशस्त्र पोलीस शिपाई पदाकरीता महाराष्ट्र राज्यातील अधिवास असलेले उमेदवारांनीच आवेदन अर्ज सादर करावे.

२.उमेदवारास देण्यात येणारे लेखी परीक्षा केंद्र/मैदानी चाचणी परीक्षेचे ठिकाण कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

३.परीक्षा केंद्र किंवा परीक्षेचे शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकिय कारणांसाठी सुध्दा किंवा इतर कारणांसाठी) स्विकारली जाणार नाही.

४.उमेदवारांच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या लेखी परीक्षा केंद्रावर नमूद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे.

५.उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

**१५) सर्वसाधारण सूचना :- (कार्यपध्दती, अटी व शर्ती):-**

१.अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षाकेंद्र/अर्ज क्रमांक इत्यादी बाबतची माहिती **www.mahapolice.gov.in** व **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, आवेदन अर्जात दिलेली माहिती/ अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३. उमेदवारास ऑफलाईन लेखी परीक्षा, शारिरीक चाचणी व कागदपत्रे पडताळणी इत्यादीकरिता स्वखर्चाने यावे लागेल.

४. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले खालीलपैकी कोणतेही एक ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.

अ) मूळ पॅन कार्ड (Original Pan Card)
ब) मूळ पासपोर्ट (Original Passport)
क) मूळ वाहन अनुज्ञप्ती (Original Driving Licence)
ड) मूळ मतदार ओळखपत्र (Original Voter ID)
इ) मूळ फोटोसह राष्ट्रीयकृत बँक अद्यावत पासबुक (Original Nationalized Bank updated passbook with photo attached)
ई) मूळ आधारकार्ड ( Original Aadhar Card)
फ) उमेदवाराने प्रवेशपत्र निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

५. उमेदवारांची OMR Based ऑफलाईन लेखी परीक्षा ही त्यांनी आवेदन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. प्रथम १०० गुणांची लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांबाबत ३३%) गुण मिळवून व गोंडी-माडीया भाषेतील अतिरिक्त १०० गुणांच्या लेखी परिक्षेत किमान ३५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. **परंतु गोंडी-माडीया भाषा चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण शारिरीक/मैदानी चाचणी निवड यादीकरीता व अंतिम निवड यादीकरीता ग्राह्य धरण्यात येणार नाही.** प्रथम लेखी परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे आधारे गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. प्रथम लेखी परीक्षा व शारिरीक चाचणी परिक्षा यामध्ये मिळालेले गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार केल्यानंतर आवश्यक तेवढ्या उमेदवारांची तात्पुरती निवडसूची तयार करुन उमेदवारांनी आवेदन अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. तात्पुरत्या निवड सूचीमधील जे उमेदवार कागदपत्र पडताळणीत पात्र ठरतील, त्यांचाच अंतिम निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल.

६. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, भरती समिती यांनी राखुन ठेवले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**१६.नेमणूकीच्या सर्वसाधारण अटी:-**

**१.** उमेदवार महाराष्ट्रातील अधिवास असावा [डोमीसाईल (Domicile) प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक] अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**२.** सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषा व गोंडी-माडीया भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेचउमेदवारास गोंडी-माडीया भाषेची चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**३.** विहीत वयोमर्यादेतील शासकिय / निमशासकिय सेवेतील कर्मचाऱ्यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑफलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास, त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहीत मार्गाने भरावे व कार्यालयाचे परवानगीची प्रत उमेदवारांनी आवेदन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

**१७) आरक्षण:-**

**अ) मागासवर्गीय आरक्षण:-**

१. विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले लगतच्या आर्थिक वर्षाचे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र तसेच ईतर प्रमाणपत्रांची साक्षांकित छायाकींत प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

२. शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक: बीसीसी-२०११/प्र.क्र.२६४/२०११/ १६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारास त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित जात पडताळणी समितीकडून पुर्ण करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. विजा (अ), भज (ब), भज (क) व भज (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: राधाओ-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**ब)समांतर आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:** उमेदवार ज्या समांतर आरक्षणासाठी दावा करु इच्छितो, त्या समांतर आरक्षणाच्या दाव्याबाबत आवेदन अर्जामध्ये स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**१. खेळाडूंसाठी:-**

राज्यातील प्रावीण्य प्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमाक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ व शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक १७.३.२०१७ मधील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्र उमेदवारांमधून भरती करण्यात येईल. खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

खेळाडू उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने, अर्ज सादर करण्यापूर्वी त्याच्या खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ मधील तरतुदींनुसार खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात आली आहे.

शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू आरक्षणाकरीता क्रिमीलेअरची अट लागू राहणार नाही. तसेच त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

**२. प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त आरक्षण:-**

शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ व दिनांक ०४ नोव्हेंबर २०१६ अन्वये प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त व भूकंपग्रस्त अन्वये समांतर आरक्षणाची सवलत देण्यात आली आहे. त्याचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्याबाबत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र, तसेच उक्त प्रमाणपत्रावर उमेदवाराचे संपूर्ण नाव असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

**३. माजी सैनिकांसाठी:-**

भूदल, नाविक दल व हवाई दल सेवेमध्ये सहा माहिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल याप्रमाणे संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एमआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.३.१९९९ मधील तरतुदींनुसार माजी सैनिकांसाठी १५% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**४.अंशकालीन पदवीधर कर्मचारी:-**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९ अन्वये सुशिक्षीत रोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट क पदामधील सरळसेवेच्या करावयाच्या नियुक्तीसाठी १०% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. सदरहू आरक्षणापैकी ५% आरक्षण हे शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ अन्वये पोलीस पाल्यांसाठी वर्ग केले असल्याने पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी ५% आरक्षण देय आहे.

**५. पोलीस पाल्य:-**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ मधील तरतुदी व शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१५/प्र.क्र.३०६/पोल-५अ, दिनांक १६.२.२०१६ मधील मार्गदर्शनानुसार पोलीस दलातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी ३ टक्के पदे पोलीस भरतीत राखीव ठेवण्यात येत आहेत. सदर आरक्षणाचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या उमेदवारांनी, ते ज्या घटकाच्या पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रीयेत सहभागी होऊ ईच्छित असतील त्या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाकरीता भरतीसाठी आवेदन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

सक्तीने सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्ती पोलीस अंमलदार यांचे पाल्यास ही सवलत लागु राहणार नाही.

**६. गृहरक्षक / होमगार्ड आरक्षण:-**

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम २०१२ मधील नियम ८ (ब) नुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्ती करतांना एकूण पदांच्या ५% पदे होमगार्डमध्ये जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात कमीत कमी ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील उमेदवारांसाठी समांतर आरक्षणांतर्गत राखीव आहेत. जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) सेवा पूर्ण नसलेल्या उमेदवारास गृहरक्षक पदाचे आरक्षण लाभ देय होणार नाही. तसेच, जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) एकत्रित सेवा पूर्ण केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा म्हणजेच समादेशक यांचा दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**७. अनाथ व्यक्तींचे आरक्षण:-**

शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करतांना उमेदवाराकडे, महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे **अनाथ प्रमाणपत्र** उमेदवाराने कागदपत्र छाननीचेवेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमेदवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची तपासणी ०६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्यामार्फत करणे आवश्यक राहील.

शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१ मधील तरतुदीनुसार भरती वर्षात पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी ओढण्यात येईल. जर पुढील भरती वर्षातही पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अनाथांव्यतिरिक्त ईतर उमेदवारांमधुन गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

समांतर आरक्षणाबाबत शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१ मधील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

समान गुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य- शासन, सामान्य प्रशासन विभाग, पूरकपत्र क्र. प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ०२/१२/२०१७ मधील तरतुदींनुसार लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा पुरावा साक्षांकित प्रतीसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

**८.** महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावातील पोलीस शिपाई पदासाठीच्या सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या मराठी भाषिक उमेदवारांना पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज करता येईल. परंतु त्यांना महाराष्ट्रातील आरक्षणाचे लाभ देय राहणार नाहीत.

**१८. ऑफलाईन परीक्षेचा निकाल:-** OMR based द्वारे उमेदवारांनी ऑफलाईन लेखी परिक्षेत प्राप्त केलेले गुण दर्शविण्यात येतील. गुणवत्ता यादी / शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी या घटकाकडून तयार करण्यात येईल.

**१९. शारीरिक चाचणी:-** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातंतील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम २०१२, महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक-१८/०१/२०१९ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे शारीरिक चाचणी घेतली जाईल.

| | | |
|---|---|---|
| अ) ५ कि.मी.धावणे | - | ५० गुण |
| ब) १०० मिटर धावणे | - | २५ गुण |
| क) गोळा फेक | - | २५ गुण |
| | | **एकुण १०० गुण** |

**२०. शारीरिक चाचणीसाठी उमेवारांची निवड करणे:-**

ऑफलाईन प्रथम १०० गुणांची लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांबाबत ३३%) गुण मिळवून व गोंडी-माडीया भाषेतील अतिरिक्त १०० गुणांच्या लेखी परिक्षेत किमान ३५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. **परंतु गोंडी-माडीया भाषा चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण शारिरीक/मैदानी चाचणी निवड यादीकरीता व अंतिम निवड यादीकरीता ग्राह्य धरण्यात येणार नाही.** प्रथम लेखी परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे आधारे गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**स्पष्टीकरण:-** अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० (१०X१०=१००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० (५X१०=५०) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

**२१. तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादीबाबत:-**

उमेदवारांना ऑफलाईन प्रथम लेखी परीक्षेत (गोंडी-माडीया चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण वगळून) व शारिरीक चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरती निवड यादी / प्रतीक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. (उदा. सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १६.३.१९९९, १३.८.२०१४ ची परिपत्रके व दिनांक १९.१२.२०१८ चे शुध्दीपत्रक तसेच गृह विभागाचे दिनांक १०.१२.२०२० चे शासन निर्णय). तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्याच कागदपत्राची पडताळणी करण्यात येऊन, कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसूची / प्रतीक्षासूचीमध्ये समावेश करण्यात येईल. **भरती प्रक्रियेत कागदपत्रांची पडताळणी शेवटी करण्यात येणार असली तरी, उमेदवारांनी भरती प्रक्रियेत येतांना प्रवेशपत्रासोबत आवेदन अर्जाची प्रत, आवेदन अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. भरती प्रक्रियेत मूळ कागदपत्रे सादर करण्याबाबत पोलीस घटक प्रमुखांकडून ज्या-ज्या वेळी कळविण्यात येईल, त्या-त्या वेळी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१५/प्र.क्र.(२५५/१५)/१३-अ, दिनांक ०५ ऑक्टोबर २०१५, शासन पुरकपत्र क्रमांक: प्रानिमं-१२१७/प्र.क्र.(९२/१७)/१३-अ, दिनांक ०२ डिसेंबर २०१७, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शानिक्र:पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५अ, दिनांक-१०.१२.२०२० आणि त्याबाबत शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. मध्ये नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे उमेदवारांची निवड यादी केली जाईल.

सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४१ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यांसहीत देय रक्कम भरणा करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचे बंधपत्र (बॉंड/हमीपत्र) संबंधीत उमेदवारांकडून घेण्यात येईल.

**२२. खालील नमुद केलेल्या कारणामुळे सादर केलेले आवेदन अर्ज नाकारल्या जातील व त्यांना भरती प्रक्रीयेकरीता हजर राहता येणार नाही :-**

**अ)** या जाहिरातीमधील दिलेल्या विहित नमुण्यानुसार नसलेला अर्ज.

**ब)** अर्जात स्वत:चे पासपोर्ट साईज छायाचित्र चिटकवलेले नसल्यास.

**क)** सुवाच्च नसलेले, अपुर्ण किंवा चुकीची माहिती भरलेले आवेदन अर्ज/स्वाक्षरी नसलेले आवेदन अर्ज.

**ड)** मागासवर्गीय असल्यास जातीचा प्रवर्ग दर्शविलेला नसलेला आवेदन अर्ज.

**ई)** पोस्टाद्वारे किंवा ईतर मार्गाने आवेदन अर्ज सादर केल्यास.

**फ)**आवेदन अर्ज अस्विकार करण्याचा संपुर्ण अधिकार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली यांना राहिल.

**२३. इतर अटी :-**

**१.** (अ) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, दिनांक-०२/०८/२०१९ अन्वये "सशस्त्र पोलीस शिपाई पदावर निवड झालेले उमेदवार हे राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली मधुन १५ वर्षे आंतर गट बदलीपात्र असणार नाही."

(ब) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्र क्रमांक : पीएमएन ०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दिनांक-१२/०५/२०२१ अन्वये राज्य राखीव पोलीस बलामधुन १२ वर्षे जिल्हा पोलीस दलात बदलीपात्र असणार नाही.

**२.** नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तसेच, मुंबई राज्य राखीव पोलीस बल अधिनियम, १९५१ व मुंबई राज्य राखीव पोलीस बल नियम, १९५९ मधील तरतुदी उमेदवारांस बंधकारक राहतील.

**३.** वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागू होईल.

**४.** सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**५.** सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्तीपुर्वी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी करण्यात येईल. सदरहू दोन्ही चाचण्यांमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारासच पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात येईल. ज्या उमेदवाराचा चारित्र्य अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही व अशा प्रकरणी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१७/प्र.क्र.२११/पोल-५अ, दिनांक १९.७.२०१७ अन्वये गठीत केलेल्या उच्च स्तरीय समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

६. **<u>मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक</u>**: महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२० दिनांक ३०.१२.१९८७ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये नमुद नियम ४ मध्ये नमुद शर्तीची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारास सदर शासन निर्णयानुसार तदर्थ मंडळाची मराठी/ हिंदी परिक्षा उत्तीर्ण करावी लागेल.

**७.** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी **संगणक अर्हता** त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

**८.** शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४.२.२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा.

**९.** शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**२४. विशेष सूचना:-**

**१.**उमेदवाराने जाहिरातीतील संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून व समजल्याची खात्री करुन आवेदन अर्ज सादर करावा.

**२.**आवेदन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथील करणे इत्यादी बदल/ सवलती नामंजूर करण्यात येतील.

**३.**परीक्षा कक्षात परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**४.**प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे मुळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.

**५.**जाहिरातीतील नमुद केलेले सर्व शासन निर्णय/अधिसूचना/शासन परिपत्रके ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

**६.**उमेदवारांना काही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईनवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक | ०७१३७- २९५०५३<br>मो.नं.९१३०१५८५८१ |

**(विवेक मासाळ)**
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१३, विसोरा
ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली.

# राज्य राखीव पोलीस बल,गट क्र.13, विसोरा,
# ता.वडसा (देसाईगंज)जि.गडचिरोली,
# सशस्त्र पोलीस शिपाई भरती 2019-20 (पुरुष)

| आवेदन अर्ज क्रमांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

> अर्जासोबत 2.5x 2.5 से.मी.आकाराचे 3 फोटो द्यावे अर्जावरील फोटोवर मुख्याध्यापक/पोस्ट मास्तर/हद्दीतील पो.स्टेशन यांची ओळख म्हणुन सही शिक्का घ्यावा

प्रति,

समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.13, विसोरा
ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली.

**विषय :- सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) या पदाकरीता आवेदन अर्ज...**

**सुचना** :- 1) अर्जदाराने माहिती स्वहस्तक्षरात मराठीत लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.
2) अर्जदाराने अर्जातील सर्व रकाने / माहिती भरणे व स्वाक्षरीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
3) अर्जदाराने अर्जातील मो.नंबर व ई-मेल आयडी अचुक नमुद करावा. लेखी परिक्षेचे हॉल तिकीट ई-मेलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

1) **अर्जदाराचे संपुर्ण नाव** :- स्वत:चे नाव वडीलाचे नाव आडनाव

2) **मराठीत** :- -------------------- ---------------------- ------------------------

**इंग्रजीत** :- [ ]

3) **सध्याचा पत्ता** :- ------------------------------------------------------------------

तालुका -------------------- जिल्हा -------------------- पिनकोड [ ]

**मो.नंबर** [ ] **ई-मेल आयडी** [ ]

4) **कायमचा पत्ता** :- --------------------------------------------------------------

तालुका -------------------- जिल्हा -------------------- पिनकोड [ ]

5) **जन्म दिनांक** :-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| जन्मस्थळ / ठिकाण |
|---|
| |

| दिनांक 05/06/2022 रोजी असलेले वय :- | वर्ष | | महिने | | दिवस | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

| होय | नाही |
|---|---|
| | |

6) **अ) विवाहित आहात काय? (योग्य त्या ठिकाणी☑अशी खुण करावी.)**

**ब) असल्यास अपत्यांची संख्या :-** ------------------

7) **अ) धर्म:---------** **ब) जात:---------** **क)प्रवर्ग---------**

8) **अर्जदाराला ज्या प्रवर्गातुन आवेदन अर्ज करावयाचा आहे त्या प्रवर्गाखाली ☑ अशा खुणाने दर्शवावे.**

| प्रवर्ग | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | OPEN | अर्जदार नॉन क्रिमिलेअर मध्ये मोडतात काय? | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लागु असलेल्या रकान्यात ☑अशी खुण करावी | | | | | | | | | | | होय | नाही | लागु नाही |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र जोडलेले | | |
| | | | | | | | | | | | आहे | नाही | |
| | | | | | | | | | | | | | |

9) **अर्जदार कोणत्या समांतर आरक्षणामध्ये मोडतो.....................................(नमुद करावे)**
(विविध समांतर आरक्षण प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले सबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र)
(योग्य त्या रकान्यात ☑अशी खुण करावी)

| खेळाडु | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | माजी सैनिक | अंशकालीन पदविधर | पोलीस पाल्य | गृह रक्षकदल | अनाथ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

10) **अर्जदार मागास प्रवर्गाचे असल्यास दाखला सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला असावा व जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र असल्यास ते सोबत जोडावे . तसेच दाखला कोणी दिला आहे तो क्रमांक व दिनांक नमुद करावा.**

दाखला निर्गमित केलेल्या प्राधिकाऱ्यांचे पदनाम :- ------------------------------------------

दाखला क्रमांक व दिनांक :- ------------------------------------------

11) **अ) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :-**

| अ.क्र. | शिक्षण | शालेय संस्थेचे नाव | केंद्र / बोर्ड | वर्ष | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |

**ब) खालील नमुद केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडली असल्यास त्या समोरील रकाण्यात ☑अशी खुण करावी (खालील नमुद सर्व कागदपत्रे दि.05/06/2022 पर्यंत निर्गमित केलेले असावेत)**

| अ.क्र. | कागदपत्रे / दस्ताऐवज | होय | नाही |
|---|---|---|---|
| 1 | 12 वी इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रक | | |
| 2 | शाळा सोडल्याचा दाखला (वयाबाबतचा पुरावा) | | |
| 3 | पुढील शिक्षणाचे गुणपत्रक व उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | | |
| 4 | जातीचे प्रमाणपत्र | | |
| 5 | जातीचे वैधता प्रमाणपत्र | | |
| 6 | 2021-2022 या आर्थीक वर्षामध्ये प्रभावी असलेले नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र | | |
| 7 | समांतर आरक्षणासंबंधीचे प्रमाणपत्र (खेळाडु / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / माजीसैनिक/ अंशकालीन पदविधर/ पोलीस पाल्य/ गृहरक्षक दल/ अनाथ) | | |
| 8 | महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.अधिसुचना क्रमांक एसआरव्हि-2000/प्र.क्र.17/2000 /12, दि.1.07.2005 नमुना "अ" नियम 4 प्रमाणे लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र | | |

12) उमेदवार हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहेत काय?
(लागु रकान्यात ☑अशीखुण करावी)

| होय | नाही |
|---|---|
| | |

13) अधिवास प्रमाणपत्र जोडले आहे का?

| होय | नाही |
|---|---|
| | |

14) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे पाल्य आहात काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

मी याव्दारे शपथपुर्वक नमुद करतो की, मला शासकिय सेवेकरीता अपात्र घोषीत करण्यात आलेले नाही. तसेच मी अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य बरोबर आहे. चुकीची आढळल्यास निवड प्रक्रीयेपासुन मला अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस/सुचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी :- ............................

दिनांक :- अर्जदाराचे पुर्ण नाव :- ............................

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील**

**प्रतिज्ञापनाच्या नमुना-अ**

प्र ति ज्ञा प न
नमुना-अ
**(नियम 4 पहा)**

मी श्री ................................................................................ श्री............................................................
यांचा मुलगा, वय ........ वर्ष, राहणार..........................................................................................................याद्वारे
पुढील प्रमाणे असे जाहिर करतो की,

1) मी .......................................... या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......... आहे (असल्यास, जन्मदिनांक नमुद करवा.)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असले तर दि.28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :- सही/-

उमेदवाराचे नाव